# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** अक्कलकोट उत्तर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0004 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/01/2026 16:00

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 16/10/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/10/2025
**Time From (वेळेपासून):** 15:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/01/2026 **Time (वेळ):** 15:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 023
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/01/2026 16:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जेऊर रोडवरील अँक्सिस , बँकेच्या समोरील परिसरात,अक्कलकोट

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत ,प्रतिबंधक विभाग सोलापूर ,सोलापूर , सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत ,प्रतिबंधक विभाग सोलापूर ,सोलापूर , सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7038401100

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मीकांत अशोक सवळी | | | 1. मैदर्गी नगरपरिषद जवळ, मैंदर्गी, ताअक्कलकोट, जिसोलापूर, अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.05/01/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.16/10/2025 रोजी आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार श्री राहुल विजयकुमार चव्हाण, रा. बोरोटी (खु), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार कळविली असून त्याअनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही तात्काळ आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या कार्यालयास 13.15 वा चे सुमारास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 14.00 वा चे सुमारास 1) मोहन मुकुंद गायकवाड, पद – कनिष्ठ श्रेणी लिपिक, विधान सल्लागार विभाग व 2) दिव्येश दत्तात्रय जगदाळे, पद -कनिष्ठ श्रेणी लिपिक, सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांची व माझी ओळख सांगुन तक्रारदार श्री राहूल विजयकुमार चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अक्कलकोट येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील सहायक पोलीस उपनिरीक्षक कोळी, पोहेकॉ/71 सोनवणे, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोहेकॉ/984 गायकवाड यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अल्ट्रा व्हायोलेट दिवा. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच 12 यु.सी 4108 या दोन वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 14.20 वा शासकीय वाहनातून आम्ही, सहायक पोलीस उपनिरीक्षक कोळी, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोहेकॉ/894 गायकवाड असे आणि पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांचेकडील खाजगी वाहन किया, रजि क्र. एम.एच 10. डी.एल 7804 यामधून पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले व पोहेकॉ/71 सोनवणे असे आम्ही अक्कलकोटकडे रवाना झालो. आम्ही कुंभारी, वळसंग मार्गे 15.00 वा चे सुमारास अक्कलकोट शहराच्या अलीकडे सोलापूर गाणगापूर रोडवरील अक्कलकोट बायपासजवळील ब्रिजजवळ पोहोचलो. दरम्यानच्या काळात पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी फोनवरून दिलेल्या सुचनेनुसार तक्रारदार चव्हाण हे ब्रिजजवळ येऊन थांबले होते. सदर ठिकाणी आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसण्यास सांगुन पोलीस अंमलदारांना वाहनापासून लांब जाऊन थांबण्यास सांगितले. त्यानंतर शासकीय वाहनामध्ये तक्रारदार चव्हाण यांची पोलीस उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंच व आमची ओळख करून दिल्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. राहुल विजयकुमार चव्हाण, वय 32 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. मु.पो. बोरोटी (खु), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर असे असल्याचे सांगून, त्यांचे मौजे कल्लप्पावाडी गट नं.196/1 याठिकाणी 04 एकर शेतजमीन असून त्याठिकाणी ऑगस्ट 2024 मध्ये 1200 सफेद चंदनाची रोपे लागवड केले असल्याचे सांगितले. सफेद चंदनाच्या रोपांना वाढीसाठी इतर पिकांच्या मुळावर अवलंबून राहावे लागते, त्याकरीता त्यांनी कृषी सहायक श्री लक्ष्मीकांत सवळी यांची भेट घेऊन त्यांच्या सल्ल्याने शासनाच्या फळबाग लागवड योजनेच्या माध्यमातून सफेद चंदनाला जोडपीक म्हणून आंब्याचे लागवड करण्याचे ठरविले. कृषी सहायक श्री सवळी यांच्या सल्ल्यानुसार तक्रारदार चव्हाण यांनी

फळबाग लागवडीच्या अनुदानासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता करून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जॉबकार्डधारकांकडून शेतामध्ये आंब्याच्या रोपांचे लागवडीकरीता 640 खड्डे मारून घेतले. त्यानंतर ऑक्टोबर 2025 च्या पहिल्या आठवडत कृषी सहायक श्री सवळी व कल्लप्पावाडी ग्रामपंचायतीचे रोजगार सेवक श्री दत्ता कोळी हे दोघे तक्रारदार यांच्या शेतात जाऊन खड्ड्यांची पाहणी करून जिओटॅगद्वारे फोटो काढून घेतले. त्यानंतर शेतामध्ये खड्डे मारलेल्या जॉबकार्डधारकांची मजुरीची रक्कम मिळणेकरीता तक्रारदार चव्हाण यांनी दि. 13/10/2025 रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय अक्कलकोट येथे जाऊन कृषी सहायक सवळी यांची भेट घेऊन चौकशी केली असता, त्यांनी खड्ड्यांची मजुरी व यापुढील फळबाग रोपे खरेदी, लागवड या सर्व कामाच्या अनुदानाची कामे करून देण्यासाठी 25,000/- रू रकमेची मागणी केली आहे अशा आशयाची तक्रार सांगुन त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून गायकवाड व पंच क्र.2 म्हणून जगदाळे यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार चव्हाण, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हॉईस रेकॉर्डर व कज्ए कंपनीचेपॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर तक्रारदार चव्हाण व दोन्ही पंचांचे निवेदन घेण्यासाठी आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये EVM कंपनीचे 8GBचे मेमरीकार्ड सदर मेकरीकार्डवर EVM 8GB MICRO SD HCत्याच्या मागील बाजूस CE MM8GC10AXBD-194 XQH 250120 SM MADE IN TAIWAN EVMTF/8GB0225SE असे नमुद असलेले नवीन सिलबंद मेमरीकार्ड पाकिटातून बाहेर काढून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले आणि व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार चव्हाण व दोन्ही शासकीय पंचांचे पडताळणी निवेदन घेतले, ती वेळ 15:46 वा ची होती. त्यानंतर तक्रारीची पडताळणी करण्यासाठी कृषी सहायक सवळी यांची कोठे भेट होऊ शकते याची खात्री करण्यासाठी आम्ही तक्रारदार चव्हाण यांना कृषी सहायक सवळी यांना फोन करण्यास सांगितले. तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे मो.क्र.8484904090 यावरून कृषी सहायक सवळी यांचे 7038039291 यावर 15.50 वा चे सुमारास कॉल केला. सदरवेळी तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचा फोन स्पीकर मोडवर ठेऊन संभाषण केले. त्यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर सुरू करून ते तक्रारदार चव्हाण यांच्या फोनसमोर धरले. कृषी सहायक सवळी यांनी तक्रारदार चव्हाण यांचेशी चर्चा करून नाक्यावर हाय जेऊर रोडला. ॲक्सिस बँक नाही का? असे सांगुन ॲक्सिस बँकेजवळ येण्यास सांगितले. सदरचे संभाषण पंचासमक्ष व्हॉईसरेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डवर रेकॉर्ड करून घेण्यात आले.

त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर 15.53 वा चालू करून तो तक्रारदार चव्हाण यांचे शर्टाच्या आत असलेले बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून तक्रारदार चव्हाण व पंच क्र.1 गायकवाड यांना तक्रारदार चव्हाण यांचे लाल रंगाचे हिरो होन्डा स्प्लेंडर, रजि. क्र. एम.एच 13, बी.ए 1657 यावरून ॲक्सिस बँककडे जाऊन कृषी सहायक सवळी यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. सदरवेळी आम्ही, पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले, पंच क्र.2 जगदाळे व सर्व अंमलदार अक्कलकोट बायपासजवळील ब्रिजजवळ थांबून राहिलो.

काही वेळाने तक्रारदार चव्हाण व पंच क्र.1 गायकवाड हे दोघे ब्रिजजवळ आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16:29 वा. ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार चव्हाण यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र.2 जगदाळे यांना सांगा असे सांगितले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र.1 गायकवाड दोघे मोटारसायकलवरून ॲक्सिस बँकजवळ गेलो, त्याठिकाणी कृषी सहायक सवळी हे दिसून येत नसल्याने मी माझे मो.क्र.8484904090 यावरून त्यांचे मो. क्र.7038039291 यावर कॉल केला, आणि मोबाईल स्पीकर मोडवर ठेऊन संभाषण केले, सदरवेळी कृषी सहायक सवळी यांनी थांबा थांबा पाच मिनिट आलो थांबा असे सांगितले. त्यानंतर काहीवेळाने ते बँकेसमोर आले, त्यावेळी मी त्यांना सवळी साहेब नमस्कार असे बोलून चर्चेस सुरूवात केली आणि सर आपल प्रकरण बघा सर कुठपर्यंत आलय असे विचारलो असता लोकसेवक सवळी यांनी बोला असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना आता कस स्टार्ट करायच सर प्रकरण आता खड्डे वगैरे ते मारलेल ते सगळ असे विचारलो असता त्यांनी कशाच असे विचारले. त्यावेळी मी त्यांना ते फळबागच सर. फळबाग असे सांगितले. त्यानंतर मी माझ्या कामाबाबत चर्चा सुरू केली. सदरवेळी सवळी यांनी माझ्या कामाबाबत बोलून मस्टर द्या असे सांगितले. त्यावर मी मस्टर? मागणी मस्टर. लिहून ठेवलो सर मी वाचा. थोडया लोकांच सर मी लिहून ठेवलेल हाय. सर माझ असे सांगुन मस्टर मागणी अर्ज त्यांच्याकडे दिला. सवळी यांनी मस्टर मागणी कागदपत्राची पाहणी करून आधारकार्ड, मोबाईल नंबर आ.. बँक

पासबूक असे बोलून मस्टर मागणीमधील सर्व नमुद मजूरांचे आधारकार्ड, बँक पासबूक, मोबाईल क्रमांक लागणार असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना अजून सर असे बोलून माझ्या कामाकरीता आणखी काय लागणार याबाबत विचारणा केली असता सवळी यांनी ह्याच्या अगोदर आपून तिथ मंजूर करून घ्याव लागतय ना आपल्याला अजून असे सांगितले. त्यावर मी हा सर? अजून मंजूर झाल नाही ना सर? का मंजूर झालय.. झालय म्हणल्यावर... असे विचारले असता त्यांनी मला मी काय म्हणलो तुम्हाला त्यादिवशी असे बोलून यापुर्वी माझ्या कामाच्या अनुषगाने माझ्याकडे मागणी केलेल्या लाचेविषयी विचारणा केली. त्यावर मी थोड हे करा ओ सर. पंचवीस हजार बघा सर.. दिवाळी पण हाय. असे बोलून लाच रकमेमध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न करू लागलो. त्यावर सवळी यांनी तुम्ही आता काय सांगायलाव तुम्ही. चला ठिक हाय चला मग असे बोलून लाचेची मागणी केली. त्यावर मी काय सर असे विचारले असता त्यांनी चला मग करा. मोकळ करा असे म्हणून लाच रक्कम देण्यास सांगितले. त्यावर मी पुन्हा माझ्या शेतामधील लागवडीविषयी चर्चा सुरू केली आणि त्यानंतर आता किती करू सर आता. आता किती देऊ सर दिवाळी एक आली सर. मुलांच खर्च एक असे म्हणालो असता, सवळी यांनी वीस द्या. बाकीचे पाच नंतर द्या नंतर अजून. आता द्याव लागतय असे म्हणाले. त्यावर मी आता पाच घ्या ना सर.. कमी करा ना सर असे म्हणून लाच रकमेमध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यावर त्यांनी हे जा.. तस नाही मी आता हातून देऊ का काय तुम्हाला असे म्हणाले. त्यावर मी दिवाळी आली ना सर. दिवाळी थोडफार.. असे म्हणून लाच रक्कम कमी करण्यासाठी विनंती केलो असता त्यांनी बरोबर हाय ओ मी हातून देऊ का काय? मंजूर कस करू मी? असे म्हणाले. त्यावर मी मी देतो फक्त आता सध्याला.. सध्याला दुस-याकड मागून आता.. असे बोलत असतानाच सवळी यांनी हा वीस द्या तुम्ही. सगळ होतय. नंतर तुम्ही निवांत द्या पाच. असे म्हणून तडजोडीवरून 20,000/- रू लाचेची मागणी करून नंतर 5000/- रू देण्यास सांगितले. त्यावर मी पुन्हा तडजोड करण्याचा प्रयत्न केला. शेवटी सवळी यांनी पंधरा द्या आता लगेच. उद्या मंजूर करून घेतो आणि दत्ताला सांगतो तुमच मस्टर तयार कर म्हणून. विषय संपतय. बाकीचे दहा नंतर द्या. विषय काही बोलू नका आता तुम्ही. काहीच बोलायच नाही. द्या मग चला असे म्हणून 15,000/- रू रकमेची मागणी केली आणि बाकीचे 10,000/- रू नंतर देण्यास सांगितले. त्यावर मी जातो पाहूण्याकड आता पैसे घेऊन आता. तुम्ही कुठ असता सांगा सर मी येतो असे सांगितले असता त्यांनी तुम्ही या ऑफिसला. फक्त मला फोन करा तुम्ही. असे सांगितले. तेव्हा सवळी यांनी किती वेळ लागतय? मी चाललो सोलापूरला असे सांगितले. त्यावर मी एक अर्धा तास. पंधरा मिनिट. अर्धा तास लई झाले. सर पैसे काढून येतो असे म्हणाले असता त्यांनी मला या मग लवकर या. मला गाडी आहे सोलापूरला. थांबलो मी तुमच्यासाठी असे सांगितले. त्यानंतर आम्ही अक्कलकोट बायपासजवळील ब्रिज येथे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो." याप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 गायकवाड यांना घडलेल्या हकिकतीबाबत विचारले असता त्यांनीदेखील तक्रारदार यांच्याप्रमाणे वर नमुद घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला लावून झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार यांच्यासमक्ष ऐकले असता ते पंच क्र.1 गायकवाड व तक्रारदार चव्हाण यांनी वर सांगितलेल्या प्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. सदर पडताळणीमध्ये कृषी सहायक सवळी यांनी तक्रारदार चव्हाण यांच्याकडे त्यांच्या अनुदानाचे काम करून देण्यासाठी 25,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती पहिला हप्ता म्हणून 15,000/- रू लाच मागणी करून उर्वरित 10,000/- रू नंतर द्या असे सांगुन लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही पोलीस अंमलदार सहायक पोलीस उपनिरीक्षक कोळी, पोहेकॉ/71 सोनवणे, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, व चालक पोहेकॉ/984 गायकवाड यांना शासकीय वाहनाजवळ बोलावून घेतले आणि सर्व अंमलदारांची तक्रारदार चव्हाण यांच्यासह ओळख करून दिली आणि तक्रारदार चव्हाण यांची तक्रार व त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईबाबत माहिती दिली. त्यानंतर आम्ही कृषी सहायक सवळी यांच्याविरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविले आणि तक्रारदार व पंच क्र.1 यांना रवाना करण्यापुर्वी 16.47 वा तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन व्हॉईसरेकॉर्डरद्वारे पडताळणी व सापळा कारवाईदरम्यान वापरण्यात येणा-या वर नमुद प्रमाणे वर्णन असलेल्या मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड करून घेतले.

पडताळणीवेळी सवळी यांनी तक्रारदार यांना पैसे घेऊन येताना फोन करून या असे सांगितले होते. त्यामुळे त्यांच्या ठावठिकाण्याची खात्री करून सापळा आयोजित करण्याचे ठरवून आम्ही तक्रारदार चव्हाण यांना सवळी यांच्या मोबाईल क्रमांकावर फोन करून ते कोठे भेटतील याबाबत विचारण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे मो.क्र.8484904090 यावरून सवळी यांचे 7038039291 या क्रमांकावर 16.57 वा चे सुमारास कॉल केला आणि त्यांचा फोन स्पीकर मोडवर ठेवला. यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार चव्हाण यांच्या फोनसमोर धरला परंतू सदरवेळी सवळी यांचा फोन स्विच ऑफ असल्याचे दिसून आले. त्यानंतर 17.27 वा चे सुमारास तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे वरील मोबाईल क्रमांकावरून सवळी यांना कॉल केला आणि

त्यांचा फोन स्पीकर मोडवर ठेवला. यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार चव्हाण यांच्या फोनसमोर धरला. सदरवेळी सवळी यांचा मोबाईल फोन सुरू असून ते अन्य कॉलवर व्यस्त असल्याचे दिसून आले. त्यावेळी लोकसेवक सवळी यांचे फोन अन्य कॉलवर व्यस्त असल्याने ते काहीवेळाने कॉल करतील त्यामुळे त्यांच्या फोनची आम्ही वाट पाहिली परंतू त्यांचा फोन न आल्याने 17.38 वा चे सुमारास तक्रारदार चव्हाण यांनी सवळी यांना पुन्हा कॉल केला आणि त्यांचा फोन स्पीकर मोडवर ठेवला. त्यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार चव्हाण यांच्या फोनसमोर धरला. सवळी यांनी फोन उचलून संभाषणास सुरूवात केली. त्यावेळी तक्रारदार चव्हाण यांनी तुमच फोनच बंद दाखवतय सर मी फोन कॉल करतो सर असे म्हणाले असता, लोकसेवक सवळी यांनी नाही मी निघालो. सोलापूरला आलो असे बोलून ते अर्जंट काम होत आलो मी असे सांगितले. त्यावर तक्रारदार चव्हाण यांनी सर ते पैसे अरेंज केल होत सर मी असे सांगितले असता, त्यांनी फोन करतो तुम्हाला मी. उद्या परवा फोन करतो मी तुम्हाला असे सांगुन फोन बंद केला. यानंतर काहीवेळातच सवळी यांनी तक्रारदार चव्हाण यांच्या वर नमुद मोबाईल क्रमांकावर फोन केला. त्यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करून तक्रारदार चव्हाण यांच्या मोबाईलसमोर धरला. तक्रारदार चव्हाण यांनी सवळी यांचा फोन उचलून मोबाईल स्पीकर मोडवर ठेवला आणि हॅलो सर असे म्हणाले. त्यावर लोकसेवक सवळी यांनी तुम्ही एक काम करा आता. मी मंजूरी घेतो तुम्ही लागवड करून घ्या आधी. लागवड करून घ्या बघू आपण पुढच काय. नंतर बघू आता आ? असे सांगितले. त्यावर तक्रारदार चव्हाण यांनी आज.. आता नाही सर तुम्ही भेटणार का सर? असे सवळी यांना विचारले. त्यावर त्यांनी नाही तुम्ही आधी लागवड करून घ्या मी मंजूरी घेतो. लागवड करून घ्या. मग आपण साहेबाला घेऊन येतो पाहण्यासाठी असे सांगुन फोन बंद केला. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करून कृषी सहायक सवळी यांनी तक्रारदार चव्हाण यांना फोन करून बोलावल्यास पुढील कारवाई करण्याचे ठरले. त्यानंतर ला.प्र.वि कार्यालयात सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दि.10/12/2025 रोजी तक्रारदार चव्हाण यांनी पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांना फोन करून त्यांच्या शेतामध्ये मारण्यात आलेल्या खड्ड्यांची मजुरी अद्याप जॉबकार्डधारकांच्या खात्यावर प्राप्त झाले नसल्याने त्यांनी दि.08/12/2025 रोजी कृषी सहायक सवळी यांना फोन करून माहिती घेतली असता, त्यांनी तक्रारदार चव्हाण यांना दि.10/12/2025 रोजी त्यांच्या कार्यालयात भेटण्यास बोलावले असल्याची माहिती दिली. त्यामुळे पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी आम्हास कृषी सहायक सवळी हे तक्रारदार चव्हाण यांच्याकडे पडताळणीवेळी मागणी केलेली रक्कम आजरोजी स्विकारू शकतील त्यामुळे त्यांच्यावर अक्कलकोट येथे जाऊन सापळा कारवाई करावी अश्या सुचना दिल्या. त्यामुळे आम्ही अंमलदारामार्फत सोलापूर महानगरपालिकेस पत्र देऊन यापुर्वी पडताळणीवेळी पंच साक्षीदार म्हणून काम पाहिलेले श्री गायकवाड व श्री जगदाळे यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंच 11.00 वा चे सुमारास आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी आम्ही त्यांना दि.16/10/2025 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईची थोडक्यात उजळणी करून दिली आणि कृषी सहायक सवळी यांनी दि.10/12/2025 रोजी तक्रारदार यांना भेटण्यास बोलावले असून ते लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता असल्याने अक्कलकोट येथे जाऊन सापळा कारवाई करायचे आहे असे सांगितले.

त्यानंतर आम्ही पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी व चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून गोपनीय कामाकरीता जायचे असून त्याकरीता लागणारे सर्व आवश्यक साहित्य शासकीय वाहनात ठेवण्यास सांगितले. गोपनीय कामकाजाकरीता लागणारे सर्व आवश्यक साहित्य सोबत घेतल्यानंतर पोलीस उपअधीक्षक चौगुले, आम्ही, दोन्ही पंच, वर नमुद अंमलदार शासकीय वाहन इर्टिगा एम.एच.12 यु.सी 4098 यामधून 13.00 वा चे सुमारास अक्कलकोटकडे रवाना झालो. आम्ही पाणीटाकी, वळसंग यामार्गे 13.50 वा अक्कलकोट शहराच्या अलीकडे असलेल्या पुकाळे प्लॉट येथील मोकळ्या मैदानात जाऊन पोहोचलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार चव्हाण यांना फोनवरून संपर्क साधून आम्ही थांबलेल्या ठिकाणी बोलावून घेतले. तक्रारदार चव्हाण हे 14.00 वा चे सुमारास आम्ही थांबलेल्या ठिकाणी येऊन आमची भेट घेतली. यावेळी आम्ही तक्रारदार चव्हाण यांना कृषी सहायक सवळी यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले असता त्यांनी सांगितले की, त्यांचे कृषी सहायक सवळी यांच्याशी बोलणे झाले असून ते कामकाजानिमित्त सातनदुधनी येथे गेलेले आहेत त्यामुळे सध्या ते कार्यालयात उपस्थित नाहीत. त्यामुळे काहीवेळ सवळी यांची वाट पाहून त्यानंतर सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर काहीवेळाने आम्ही तक्रारदार चव्हाण यांना त्यांचे मोबाईल फोनवरून कृषी सहायक सवळी यांना फोन करून त्यांच्या ठावठिकाणा घेण्यास तसेच ते कार्यालयात कधी परत येतील याबाबत माहिती घेण्यास सांगितले. सदरचे संभाषण रेकॉर्ड करून घेण्याच्या अनुषंगाने आम्ही तक्रारदार चव्हाण व दोघा पंचांना सोनी कंपनीचे व्हॉईसरेकॉर्डर व EVM कंपनीचे पॅकींगमधील नवीन8GB चे मेमरीकार्ड दाखवुन त्याचा वापर व उपयोग समजावून

सांगितला. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष पॅकींगमधील EVM कंपनीचे 8GBचे मेमरीकार्ड सदर मेकरीकार्डवर EVM 8GB MICRO SD HCत्याच्या मागील बाजूस EVMTF/8GMR0824 त्या खाली 008G96H07 H22170320094 असे नमुद असलेले नविन मेमरीकार्ड काढून ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घालून लॅपटॉपला लावले आणि त्यामध्ये कोणतेही ध्वनीमुद्रीत फाईल नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर 14.43 वा तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे मो.क्र.8484904090 यावरून सवळी यांचे 7038039291 यावर कॉल केला आणि त्यांचा फोन स्पीकर मोडवर ठेवला. त्यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर सुरु करून ते तक्रारदार चव्हाण यांच्या फोनसमोर धरले. सवळी यांनी तक्रारदार चव्हाण यांचे फोन उचलून इथ मोरे साहेब हायत बोला..मी अजून खेडयावरतीच हाय असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी अजून कधी येणार हायत सर अजून असे त्यांना विचारले असता, सवळी यांनी अजून टायम हाय साहेब यायलेत अजून आले नाहीत...बोला मोरे साहेब आहेत असे म्हणून त्यांचे सोबत असलेल्या मोरे नामक इसमाकडे त्यांनी फोन दिला. त्यानंतर तक्रारदार चव्हाण यांनी मोरे यांना सर त्यांना कुठ काम थांबलय ते विचारा सर त्यांना डॉक्युमेंट दिले क्लिअर त्यांना असे विचारले असता, मोरे यांनी तुम्ही लागवड तर करून घ्या असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी नाही सर ते खडडयाचे ते हे...मस्टर वगैरे काढायच असे म्हणून खड्ड्याच्या मजुरीबाबत विचारणा केली असता, मोरे यांनी नाय नाय नाय एकदा लागवड करा..कस होतय माहितय आमच्या साहेबांनी स्पष्ट सांगितलय लागवड केल्याशिवाय एकही पेमेंट काढू नका..काय करतेत लोक माहितय..खडडयापर्यंत काढून घेतेत.. पुढ कामच करत नाहीत.. मग ते परत तीन वर्षे आम्हाला झेलत बसाव लागतय काय असे बोलून तुम्ही एकदा पध्दतशीर खड्डे खोदून लागवड करून घ्या तुमच पेमेंट काढायची जबाबदारी माझ्याकड असे सांगितले. यादरम्यान काहीवेळ चर्चा करून तक्रारदार यांनी सर मला लेखी पण नाही काय नाही, माझ्याकडे ते काहीच नाही ते आपल असे विचारले असता, मोरे यांनी लेखी कसल काय पाहिजे तुम्हाला असे विचारले. त्यावर तक्रारदार चव्हाण यांनी मी आता जे डॉक्युमेंट सगळ दिलेत, माझ काम मंजुर आहे, हे तर कळण्यासाठी काय असे म्हणून त्यांनी दिलेल्या कागदपत्रांविषयी बोलणी केली. त्यावर मोरे यांनी मंजुर हाय ना तुमच..मंजुरी क्रमांक..तुम्हाला ती सगळ मंजुरी क्रमांक सगळ टाकायला लावतो, इस्टीमेट पाठवायला लावतो तुम्हाला असे सांगितले. त्यानंतर मोरे यांनी फोन कृषी सहायक सवळी यांच्याकडे दिला, त्यावेळी सवळी यांनी तक्रारदार चव्हाण यांना तुमच इस्टीमेट मंजुर हाय, म्हणून तर जिओ टॅग करायला आलतो, फोटो काढायला आलतो.. हा ते जिओ टॅग काढलो म्हणजेना मंजुर झालेल असतय असे सांगुन तक्रारदार यांचे अनुदानाचे प्रकरण मंजूर असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार चव्हाण यांनी सवळी यांना मंजुरी क्रमांकाबाबत विचारणा केल्यावर त्यांनी तांत्रिक आणि प्रशासकीय सगळ पाठवतो असे बोलून कागदपत्रे पाठवून देण्याचे आश्वासन देऊन फोन बंद केला. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर सुमारे 14.46 वा. बंद केला.

त्यानंतर सदर कारवाई स्थगित करून तक्रारदार चव्हाण यांच्यासह आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर या कार्यालयात परत आलो. त्याठिकाणी सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला. तक्रारदार चव्हाण यांनी कृषी सहायक सवळी यांच्याविरूध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.16/10/2025 रोजी केलेल्या पडताळणीवेळी 25,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती त्यापैकी पहिला हप्ता 15,000/- रू मागणी करून उर्वरित 10,000/- रू नंतर द्या असे बोलून लाचेची मागणी केली होती परंतू त्यानंतर त्यांनी आधी लागवड करून घ्या त्यानंतर अनुदानाचे पेमेंट मिळेल असे सांगुन माझी भेट घेण्यास टाळाटाळ करत आहेत तसेच ते भविष्यातही माझ्याकडे पैसे मागतील असे वाटत नाही त्यामुळे सदरची कारवाई स्थगित करून दि.16/10/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईवेळी लाचेची मागणी केलेल्या कृषी सहायक सवळी यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करावी असा जबाब दिला.

तरी तक्रारदार श्री राहूल विजयकुमार चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.16/10/2025 रोजी 15.50 ते 16.29 यादरम्यान करण्यात आलेल्या पडताळणीवेळी अक्कलकोट शहरातील जेऊर रोडवरील ॲक्सिस बँकेच्या समोरील परिसरात लक्ष्मीकांत अशोक सवळी, वय - 39 वर्षे, पद - कृषी सहायक, नेम - तालुका कृषी अधिकारी कार्यालय अक्कलकोट, रा.मैंदर्गी नगरपरिषद जवळ, मैंदर्गी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांनी तक्रारदार चव्हाण यांच्या शेतामध्ये शासनाच्या फळबाग लागवडीच्या योजनेंतर्गत आंब्याचे लागवड करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून खोदण्यात आलेल्या खड्डयांची मजुरी व यापुढील फळबाग रोपे खरेदी, लागवड या सर्व कामाच्या अनुदानाची कामे करून देण्यासाठी शासकीय पंचासमक्ष तक्रारदार राहूल विजयकुमार चव्हाण यांच्याकडे 25,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती त्यापैकी पहिला हप्ता 15,000/- रू मागणी करून उर्वरित 10,000/- रू नंतर द्या असे म्हणून लाचेची मागणी करून लोकसेवक या नात्याने सार्वजनिक कर्तव्य बजावण्यासाठी गैरफायदा मिळविण्याच्या प्रयत्न करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DIPAK BALNATH BHITADE(I (Inspector)) / DGPDBBM8202

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)